महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
CIN No.U40109MH2005SGC153646

अधिक्षक अभियंता
एच.व्हि.डी.सी. ग्र.के.संवसु प्रविभाग, चंद्रपूर
सीटीपीएस कॉम्पलेक्स चंद्रपूर.
२९४५०५ ( का)
email ID- se4300@mahatransco.in

संदर्भ.क्र./अअ/एचव्हिडीसी/ग्र.के./संवसु/प्रविभाग/चंद्र/मासंवि/ 1265 दिनांक 15 OCT 2025

## शिकाऊ उमेदवार कायदा, १९६१ अंतर्गत वर्ष २०२५-२६ करीता निवड झालेल्या शिकाऊ उमेदवारांची तात्पुरती प्रतिक्षा निवड यादी क्र. ६.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून विजतंत्री या व्यवसायातुन राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) उत्तीर्ण उमेदवारांकडुन Online अर्ज या कार्यालयाचे जाहीर सुचना क्र. अअ/एचव्हीडीसी/ग्र.के/संवसु/मंडळ/चंद्र/मासंवि/३५६ दि. २०.०३.२०२५ अन्वये मागविण्यात आले होते. सदर अर्ज सादर करण्याची अंतिम दि. २८.०३.२०२५ होती व स्वहस्ते / पोस्टाने अर्ज सादर करण्याची अंतिम दि. ०४.०४.२०२५ होती..

२. उमेदवारांची तात्पुरती निवड यादी तयार करण्यात आली असून, उमेदवारांची निवड यादी त्यांना S.S.C. व ITI (Electrician) मध्ये प्राप्त झालेल्या एकत्रित गुणांच्या सरासरीच्या आधारावर तसेच त्यांनी त्यांच्या अर्जामध्ये दर्शविलेल्या जात व इतर माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेली आहे.

३. तात्पुरती निवड झालेल्या सर्व उमेदवारांना त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, जात, उन्नत गटात मोडत नसणे इ. बाबतचे सर्व मुळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे ही पडताळणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील व सादर करू न शकलेल्या उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

४. तात्पुरत्या निवड यादीत नावाचा समावेश आहे म्हणून शिकाऊ उमेदवारीसाठी उमेदवाराचा कोणताही हक्क राहणार नाही. ही निवड यादी तात्पुरती असून, पूर्णतः उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, जात प्रवर्ग व इतर अटी व शर्ती पूर्ण करण्याच्या अधीन राहुन आहे. त्यामुळे शिकाऊ उमेदवार म्हणून निवड होणेसाठी आवश्यक असलेली पूर्वावश्यकता धारणा करीत नसल्यास किंवा आवश्यक अटी व शर्तीचा भंग होत असेल तर संबंधित उमेदवाराची उमेदवारी / निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

५. तात्पुरत्या निवड यादीत नावाचा समावेश असलेल्या उमेदवारांनी कागदपत्र पडताळणीकरीता दिलेल्या विहीत कालावधीमध्ये व विहीत वेळेत उपस्थित रहावे याची नोंद घ्यावी.



CamScanner

६.	तात्पुरत्या निवड यादी तयार करतांना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आली आहे. तथापी, अनावधानाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करून योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार एच.व्हि.डी.सी. ग्र.कें.संवसू प्रविभाग, चंद्रपूर कार्यालय राखुन ठेवत आहे.

**Selected in Order of Merit irrespective of category, as qualified reserved Category candidate not available**

| Sr. No. | Name of Candidate S/Shri | Category | Marks (Percentage) | Remark |
|---|---|---|---|---|
| 1 | Ku. Dhanshri Vilas Atram | ST | 84.00% | |

०७.	तात्पुरती प्रतिक्षा निवड यादी क्र. ५ (Provisional Wait List No. 6 ) मधील उमेदवारांनी दि. २८.१०.२०२५ पूर्वी खाली नमूद केलेल्या पत्यावर सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.१५ या कार्यालयीन वेळेत मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणीसाठी हजर राहावे. दि. २८.१०.२०२५ नंतर मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणीसाठी येणा-या उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**पत्ता :**
**अधिक्षक अभियंता**
**एच.व्हि.डी.सी. ग्र.कें.संवसू प्रविभाग**
**सि.टी.पी.एस. कॉम्पलेक्स,**
**निर्माण भवन मागे, उर्जानगर, चंद्रपूर-४४२४०४**

**(कै. अं. प्रगट)**
**अधिक्षक अभियंता**
**एचव्हिडीसी ग्र.कें.संवसू प्रविभाग, चंद्रपूर**

**दिनांक : १५.१०.२०२५**



CamScanner